Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VIII Issue – III May - June 2019

# शेतकरी उठावातील क्रांतीकारक: तंटया भिल्ल

*प्रा. रामकुमार प्रधान,*
*इतिहास विभाग*
*एसएनडीटी कला व एससीबी वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय मुंबई.२०*

**प्रस्तावना:**

तंटयाचा जन्म बिरडा गावात अत्यंत गरिब भिल्ल कुटूंबात झाला. त्याचे मुळ नाव तात्या असे होते.तंटयाचे वडिल भाऊसिंग हे मोलमजूरी करून भरत होते.तात्याच्या वडिलाकडे वडिलोपार्जित थोडी शेती होती.परंतू कर्जापोटी ती जमीन शेजारच्या गावातील शिवबा पाटलाकडे गहाण ठेवली होती.सततच्या दुष्काळमुळे शेतमाल न पिकल्याने जमीन कर्जातून मुक्त होऊ शकली नाही.काही दिवसातच तात्याच्या आईचा मृत्यू झाला. भाऊसिंग कोवळया मुळाचा सांभाळ करत कुटूंबाचा पोट भरतात, भाऊसिंगाची तबेत ढासळत जाते व एक दिवस मृत्यू होतो.त्याने घेतलेले कर्ज स्वत:च्या डोक्यावर घेऊन मालकाच्या शेतात काम करावे लागते.

तात्या मालकाला जमीनी बद्दल विचारतो परंतू शिवबा पाटील त्याला उडवाउडवीची उत्तरे देतो,तात्या कोर्ट कचेरी करूनही निकाल पाटलच्या बाजुने लागतो व तात्यावर खोटे आरोप लावून तुंरूगात पाठविले जाते.एक वर्षानंतर तात्या तुंरूगातून सुटका होऊन येतो व हिरापूर गावी राहू लागतो.व मोल मजुरी करून पोट भरतो.तात्यावर परत खोटे आरोप लावून तुंरूगात पाठविले जाते.तात्या दोनदा तुंरूगातील खडतर शिक्षा भोगून आल्यानंतर त्याच्यावर अन्याय केलेल्यांना धडा शिकविण्याची भावना त्याच्या मनात निर्माण होत गेली व त्याने आपले साथीदार जमवून प्रस्थापीतान विरोधात बंड करून अन्याला वाचा फोडण्याचे काम सुरू केले होते.

**तात्याची फसवणूक आणि अटक:**

शिवबापाटला पुढे तात्याच्या रूपाने संकट उभे होते म्हणून त्यांनी तात्या विरूध्द कट रचून पाटलाचा मुलगा मोहन यांस घरी चांगली वागणूक देत नाही हे कारण दाखवून त्याला तात्याकडे पाठविले.तात्याने मोहनला समजावले परंतु मोहन न ऐकता तात्या सोबत राहू लागला.काही दिवसात मोहनने तात्याला घरी जाण्याचा आग्रह केला होता.ते दोघेही मोहनच्या घरी पोखरला गेले.तात्याला पाटलानी कोर्ट कचेरीतून मुक्त करण्याच आश्वासन देऊन,त्यातून मुक्त होण्यासाठी एका कागदावर सहया घेतल्या व जमीन आपल्या नावावर केली.घरात दडून बसलेल्या पोलिसांनी तात्यावर झडप घालुन अटक केली.त्यास खांडव्याच्या जेल मध्ये पाठविले होते.त्याच काळात तात्याचे साथिदार दौल्या व बिजन्या यानाही पकडून खांडव्याच्या जेल कैद केले होते.

**खांडवा जेल मधून पलायन:**

२४ डिसेंबर १८६८ रोजी त्याला अटक करून खांडव्याच्या कारागृहात डांबले तिथे न्यायधिशाच्या हवालातमध्ये दौल्या व बिजन्या यांनाही घरफोडीच्या आरोपा खाली डांबून ठेवण्यात आले होते.या तिघांनी मिळून तुंरूगाच्या भिंतीचा चुना

कुजून काही दगड काढून टाकले.सर्वांच्या धोतराच्या एकत्र गाठी मारून त्याच्या सहयाने ते भिंतीवर चढले व जेलच्या बाहेर पसार झाले होते.

पलायनानंतर इंदूर प्रांतातील सिवना या गावातून तंटयाने निमाडच्या उपायुक्ताला उघड आव्हान पाठविले.या काळात इंदूर प्रांतातील अनेकांनी तंटयाला मदत केली त्यातून त्याने शस्त्र खरेदी केली होती.

**तंटयाचा वाढता प्रभाव आणि जनसमुहाचा पाठिंबा:**

तंटयाने निमाड प्रांतातील डेप्यूटी कमिशनला आव्हान देऊन इंग्रजी सत्तेविरोधात बंड उभारले.तसेच मोगल काळापासून अस्तित्वात असलेले मालगुजार,सावकार यांच्या विरोधात उठाव सुरू केले होते. त्यांच्या कडे गरिबांच्या असलेल्या जमिनी परत मिळवून देण्यासाठी, त्यांच्या जुलमी राजवटीतून मुक्ती देण्यासाठी तंटयाचा जन्म झाला अशी सर्वांची भावना सर्वत्र वाढू लागली. त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली.तंटयाने भिल्लांची सुसंघटित हेर यंत्रणाच उभारली होती.तंटयाचे हेर मालगुजार व इंग्रज अधिका–याची माहिती देत असत.तंटयाविरूध्द माहिती देण्यास कोणीही पुढे येत नसत.

**तंटयाची लोकपयोगी कामे:**

तंटया ब्रिटिशांच्या व सावकार,मालगुजारांच्या दृष्टीने जरी दरोडेखोर म्हणून नावारूपाला असला तरी निमाड,होशंगाबाद,बैतुल या भागात शेतकरी,गरिब आदिवासी यांच्या मनात मदत करणारा–रक्षणकर्ता अशीच त्याची प्रतिमा निर्माण झाली होती.आता पर्यंत निमाड प्रांताला सर्व शासनकर्त्यांनी लुटण्याचंच काम केले होते.ही प्रथा तंटयाने मोडली.त्याने सावकार–मालगुजरांची संपत्ती लुटून गरजू गरिबांना वाटली,सावकाराकडील जमिन सोडविण्यास मदत करणे,लग्न कार्यास मामाच्या भूमिकेतून मदत करणे,दुष्काळ काळात सरकारी धान्याची ट्रक लुटून जनतेला वाटणे या कार्यामुळे जनमानसातील त्याची प्रतिमा वाढली होती.

**तंटयाचा ब्रिटिश सत्तेविरूध्द लढा:**

तंटया तत्कालिन ब्रिटिश सत्तेविरूध्द एकटाच झंजत होता.तंटयाच्या कारवाया थांबविण्यासाठी ३० डिसेंबर १८८२ पासून ब्रिटिश सरकारणे प्रयत्न करूनही यश येत नव्हते. ब्रिटिशांनी अनेक कार्यक्षम अधिका–यांची नियूक्ती केली.तंटयाला पकडण्यासाठी स्वंतत्र फौज नेमण्यात आली.तरिही या फौजेला यश आले नाही.स्वातंत्र्याच्या या लढयात तंटयाने दहा वर्ष प्रतिहल्ले करून झुंजवत ठेवले होते.

**निष्कर्ष:**

तंटया भिल्ल एक स्वंतत्र सेनानी होता. त्याने प्रस्तापित मोगल शासक औरंगजेब व इंग्रजी राजवटीतील अन्याविरूध्द बंड करून जनसामान्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी क्रांतीकारक चळवळ निर्माण केली. तो गोरगरिबांचा रक्षणकर्ता ठरला.अशा आदिवासी नायकाला बंडखोर ही उपमा न देताा त्याला क्रांतीकारक संबोधणे संयुक्तीक ठरेल.

International Innovative Journal Impact Factor (IIJIF) Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VIII Issue – III May - June 2019

**संदर्भ:**

१. रसेल ॲण्ड हिरालाल, दि ट्राईब्ज ॲंड कास्ट ऑफ दि सेन्ट्रल प्रोव्हिन्सेस ऑफ इंडिया,मॅकमिलन कं.लि.१९१६

२. गुहा,बी.एस.दि ट्राईब्ज ऑफ इंडिया,खंड.२,भारतीय आदिवासी सेवक संघ,दिल्ली,१९५१

३.विश्वनाथ देशपांडे (अनुवादीत),तंटया भिल्ल आणि शेतकरी उठाव:संदर्भ साहित्य,सांकेत प्रकाशन,औरंगाबाद,२००४

४. डॉ.गारे गोविंद,रॉबिनहुड तंटया भिल्ल,आदिवासी वीर पुरूष,श्रीविद्या प्रकाशन,पुणे,१९८६

५. आत्राम,व्यंकटेश,दोन क्रांतीवीर,सेवा प्रकाशन,अमरावती,१९६८

६. अयोध्या सिंह,भारत का मुक्ति संग्राम, मॅकमिलन प्रकाशन,कलकत्ता,१९९४